पोलीस स्टेशन खदान जिल्हा अकोला
दुरध्वनी क्रमांक :-०७२४-२४०२३३२
ईमेल आय डी :-ps.khadan.akola@mahapolice.gov.in

# प्रेस नोट

## पो.स्टे. खदान ची कारवाई

## ईन्स्टा कार्ट प्रा.लि.कंपणीमधील मोबाईल व इतर पार्सल चोरीतील आरोपींना अटक, आरोपींकडुन ०८ मोबाईल व वाहनासह २,७५,४३८/- रू चा मुद्देमाल जप्त

दिनांक २१/०८/२०२५ इन्स्टाकार्ट सर्व्हीसेस प्रा.लि. कंपणीचे एक हब कुलस्वामीनी मंगल कार्यालय जनता सुपर शॉपी सहकार नगर अकोला येथे असुन दिनांक ११/०५/२०२५ रोजी ते दिनांक २८/०६/२०२५ रोजी चे दरम्यान कंपणीचे शिपमेंट मध्य पार्सल गहाळ व चोरी झाल्याचे दिसुन येत असुन कंपणीमध्ये ऑडीट करून तपासणी दरम्यान खालील प्रमाणे **वेगवेगळया कंपणीचे १२ नग मोबाईल किंमत २,१५, ८२६/- रू चे मोबाईल व इतर पॅकींग असलेले पार्सल ४५८ वस्तुची किंमत ३,७०,५०६/- रू असा एकुण ५,८६,३३२/- रूपये चा मुद्देमाल कुरीअर कंपणीमध्ये काम करणारे कर्मचारी यांनी संगनमत करून चोरी केली आहे अशा फि चे जबानी रिपोर्ट वरून पोस्टे खदान अप.क ७२४/२०२५ कलम ३०६, ३(५) बि.एन.एस प्रमाणे गुन्हा दाखल करून तपासात घेतला.**

**सदर गुन्हयाचा तपास करीत असतांना** तांत्रीक बाबीचे विश्लेषन कामी मदत घेवुन आरोपी नामे १) शादाब अहमद अनिस अहमद, वय २६ वर्षे, रा गंगानगर, टि पाईंट वाशीम बायपास अकोला २) मोसीन खान पिर खान वय २७ वर्षे, रा. भगतवाडी गल्ली नं ९ ओ जुने शहर अकोला यांना अटक करण्यात आली असुन आरोपी यांचे ताब्यातुन चोरी गेलेले एकुण ८ नग वेगवेगळया कंपणीचे ॲन्ड्रॉईड **८ नग मोबाईल १,५५,४३८/-व वाहन OLA कंपणीची ईलेक्ट्रानीक मोपेड गाडी क. MH30BY3970 किंमत अदाजे १,२०,०००/- रूपये आसा एकुण २,७५,४३८/- रूपये किमतीचा मुद्दमाल जप्त करण्यात आला.**

**सदरची कारवाई मा. श्री. अर्चित चांडक, पोलीस अधिक्षक सा अकोला, मा. श्री. रेड्डी सा, अपर पोलीस अधिक्षक अकोला, मा.श्री. सुदर्शन पाटील सा. उपविभागीय पोलीस अधिकारी शहर विभाग अकोला यांचे मार्गदशनाखाली श्री मनोज केदारे, पोलीस निरीक्षक पोस्टे खदान, मनिषा तायडे, सहा.पोलीस निरीक्षक पोस्टे सायबर , पोहेकॉ/निलेश खंडारे, पोहेकॉ/अमित दुबे, पोहेकॉ/गिरीष विर, पोकॉ/अभिमन्यु सदांशिव,पोकॉ वैभव कस्तुरे, पोस्टे खदान तसेच पोकॉ स्वप्नील दामोदर, पोकॉ. राहुल सानप पोस्टे सायबर अकोला यांनी सदरची कारवाई केली.**

( मनोज केदारे )
पोलीस निरीक्षक
पो.स्टे .खदान अकोला